आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१४ ऑगस्ट २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला देशवासियांना संबोधित करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून देशाच्या प्रगतीचा आढावा
- देशभरात उद्या ७८वा स्वातंत्र्य दिन साजरा होणार, नवी दिल्लीत लाल किल्ला इथं प्रधानमंत्री नरेंद मोदी यांच्या हस्ते ध्वजारोहण
- स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर १ हजार ३७ कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकांची घोषणा
- गणेशोत्सवानिमित्त गावी जाणाऱ्या गणेश भक्तांना यंदाही टोलमाफीची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

  **आणि**
- थायलंडच्या संविधानिक न्यायालयाकडून प्रधानमंत्र्यांना पदच्युत करण्याचे आदेश

**<><><><><>**

राजकीय लोकशाहीच्या सातत्यपूर्ण प्रगतीमुळे सामाजिक लोकशाही अधिक दृढ व्हायला मदत होते, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला देशवासियांना संबोधित करताना त्या बोलत होत्या. यासंदर्भातल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विधानाची आठवण करून देत राष्ट्रपतींनी सामाजिक लोकशाहीची गरज अधोरेखित केली. सामाजिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी सरकार विविध योजना राबवत असल्याचंही त्यांनी सांगितलं. यावेळी राष्ट्रपतींनी देशवासियांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि गेल्या ७८ वर्षात देशानं केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला.

यावेळी राष्ट्रपतींनी देशाने केलेल्या प्रगतीचा पट मांडला. २०२१ ते २०२४ या काळात देशानं ८ टक्के आर्थिक वाढ नोंदवली असून भारत सर्वात वेगानं वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांच्या रांगेत जाऊन बसल्याचं राष्ट्रपती मुर्मू यांनी सांगितलं. भारत जगातली पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला असून लवकरच पहिल्या तीन अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा समावेश होणार आहे, असं त्या म्हणाल्या. गेल्या काही वर्षात असंख्य कुटुंबं गरीबी रेषेतून वर आले असून राहिलेल्यांना गरीबी रेषेच्या बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असं राष्ट्रपती म्हणाल्या.

यावेळी राष्ट्रपतींनी शेतकऱ्यांच्या कामगिरीबद्दल गौरवोद्गार काढले. तंत्रज्ञान आणि स्टार्ट अप क्षेत्रात देशानं केलेल्या कामगिरीचंही राष्ट्रपतींनी कौतुक केलं.

महिला आणि युवांच्या कल्याण आणि सक्षमीकरणासाठी सरकार करत असलेल्या प्रयत्नांचं राष्ट्रपतींनी कौतुक केलं. महिलांच्या सक्षमीकरणाला सरकारने महत्व दिलं असून त्यासाठी गेल्या दशकभरात अर्थसंकल्पामध्ये निधीत तीनपट वाढ करण्यात आल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या. सामाजिक न्याय ही सरकारीच प्राथमिकता असून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती या समुदायांसाठी सरकारनं महत्वाची पावलं उचलली आहेत, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सांगितलं. आपल्या वैविध्यासह एकत्र येण्याचं आवाहन त्यांनी केलं.

क्रीडा क्षेत्रातल्या प्रगतीचाही राष्ट्रपतींनी आपल्या भाषणात आवर्जून उल्लेख केला.

**<><><><><>**

उद्या देशभरात ७८वा स्वातंत्र्य दिन साजरा होणार आहे. उद्या दिल्लीतल्या लाल किल्ला इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ध्वजारोहण असून किल्याच्या ऐतिहासिक तटबंदीवरून ते देशाला संबोधित करतील. यंदाच्या स्वातंत्र्य दिन

सोहळ्याची संकल्पना विकसित भारत अशी आहे. स्वातंत्र्य दिन सोहळ्यात सहभागी होण्यासाठी केंद्र सरकारने देशभरातल्या विशेष पाहुण्यांना आमंत्रित केलं आहे. यामध्ये महाराष्ट्रातल्या १२३ हून अधिक व्यक्तिंचा समावेश आहे. यात विशेष आमंत्रितांसह महिला, युवक, शेतकरी, आदिवासी, क्षेत्रीय अधिकारी आणि विविध सरकारी योजनांचे लाभार्थी, MyGov स्वातंत्र्य दिन प्रश्नमंजुषेचे विजेते आणि नीति आयोगाच्या विशेष आमंत्रितांसह समाजातल्या विविध घटकांचा समावेश असेल.

ध्वजारोहण समारंभाचं थेट प्रक्षेपण आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रावरून सकाळी सात वाजता प्रसारित होईल. त्यानंतर देशभरातल्या विविध प्रादेशिक आकाशवाणी केंद्रांवरूनही या सोहळ्याचं प्रसारण होईल. आकाशवाणी एआयआर या अधिकृत यूट्यूब वाहिनीवरूनही त्याचं थेट प्रक्षेपण होईल. या सोहळ्याच्या प्रादेशिक भाषांमधल्या आवृत्तीचं प्रसारण त्याच दिवशी रात्री साडे नऊ वाजता प्रादेशिक केंद्रावरून प्रसारित होईल.

**<><><><><>**

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस, अग्निशमन, होमगार्ड, नागरी सुरक्षा आणि सुधारणा सेवेच्या एकंदर १ हजार ३७ कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकांची घोषणा करण्यात आली आहे. तेलंगण पोलीस दलाचे मुख्य कॉन्स्टेबल चडूवू यादय्या यांना राष्ट्रपती शौर्यपदक जाहीर झालं आहे. २१३ कर्मचाऱ्यांना शौर्यपदक, तर ९४ जणांना विशेष सेवेसाठी राष्ट्रपती पदकानं सन्मानित करण्यात येत आहे. यापैकी ७५ कर्मचारी पोलीस सेवेतले, ८ अग्निशमन सेवेतले, ८ नागरी सुरक्षा आणि होम गार्ड सेवेतले, तर ३ सुधारणा सेवेतले कर्मचारी आहेत. यामध्ये राज्यातल्या चिरंजीव राम छेबीला प्रसाद, राजेंद्र डहाळे, सतीश गोवेकर यांचा समावेश आहे. ७२९ जणांना प्रशंसनीय सेवेसाठी पदकं जाहीर झाली आहेत. यात महाराष्ट्रातल्या विविध सेवांमध्ये कार्यरत असलेल्या ५९ कर्मचाऱ्यांचा समावेश

आहे. भारतीय पोलीस सेवेचे अधिकारी, अतिरिक्त पोलीस महानिरीक्षक अनुज तारे यांना शौर्यपदक जाहीर झालं आहे. तर अतिरिक्त महासंचालक चिरंजीव प्रसाद, संचालक राजेंद्र डहाळे आणि सहायक पोलीस आयुक्त सतीश गोवेकर यांना परमसेवा पदकानं सन्मानित करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

देशातल्या संरक्षण क्षेत्राला आत्मनिर्भर करण्यासाठी विविध सुधारणा राबवल्या आहेत असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आज म्हणाले. स्वातंत्रदिनाच्या पूर्वसंध्येला त्यांनी आकाशवाणीवरुन सैन्य दलांना संबोधित केलं. गेल्या १० वर्षात देशातल्या कंपन्यांकडून ६ लाख कोटी रुपयांच्या वस्तू संरक्षण दलासाठी विकत घेतल्याचं ते म्हणाले. या कालावधीत देशांतर्गत संरक्षण वस्तूंचं उत्पादन दुप्पट झालंय असं ते म्हणाले. एकेकाळी संरक्षण विषयक वस्तू आयात करणारा आपला देश आता निर्यात करतोय असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी **अभिनेता स्वप्नील जोशी** याने आकाशवाणीला सांगितलं..

**होल्ड--बाईट - स्वप्नील जोशी**

**<><><><><>**

येत्या गणेशोत्सवानिमित्त गावी जाणाऱ्या गणेश भक्तांना यंदाही टोलमाफीचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज जाहीर केला. येत्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी मुंबईत बैठक झाली, तेव्हा ते बोलत होते. राज्यात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, गणपती आगमन आणि विसर्जन मार्गावरील खड्डे तातडीने बुजवावेत तसंच कृत्रिम तलावांची संख्या वाढवावी असे विविध निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी या बैठकीत दिले.

**<><><><>**

राष्ट्रीय चाचणी संस्थेनं यंदाच्या यूजीसी नेट परीक्षेचं नवं वेळापत्रक जाहीर केलं असून २६ आणि २७ ऑगस्ट रोजी होणारे पेपर अन्य तारखांना घेतले जाणार असल्याचं म्हटलं आहे. अन्य वेळापत्रकात मात्र कोणताही बदल केलेला नसल्याचं या संस्थेनं स्पष्ट केलं आहे.

**<><><><>**

थायलंडच्या संविधानिक न्यायालयानं प्रधानमंत्री स्रेथा थविसिन यांना पदच्युत केले आहे. १६ वर्ष कैदेत असलेल्या माजी वकीलाची मंत्रीमंडळात नियुक्ती करुन नैतिक मूल्यांचं उल्लंघन केल्याचा आरोप न्यायालयानं ठेवला आहे. ५ विरुद्ध ४ अशा बहुमतानं न्यायाधीशांनी हा निर्णय घेतला. ४० सिनेटरनं न्यायालयानं प्रधानमंत्र्यांच्या निर्णयाला आव्हान दिलं होतं. थविसिन गेल्यावर्षी ऑगस्टमध्ये निवडून आले होते. संसदेकडून नव्या प्रधानमंत्र्यांची नियुक्ती होईपर्यंत उपप्रधानमंत्री फेमुथन वेचायोचाई काळजीवाहू प्रधानमंत्री पदाचा पदभार सांभाळणार आहेत.

**<><><><>**

हॉकी इंडियाने भारतीय हॉकी संघातली १६ क्रमांकाची जर्सी निवृत्त केली आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सलग दुसरं कांस्यपदक मिळवणाऱ्या भारतीय संघाचा गोलकीपर पी आर श्रीजेश यांची ही जर्सी यानंतर मैदानावर दिसणार नाही. श्रीजेश यांच्या गौरव सोहळ्यात हॉकी इंडियाचे महासचिव भोलानाथ सिंह यांनी ही घोषणा केली. श्रीजेश यांना भारतीय कनिष्ठ हॉकी संघाचे प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**<><><><><>**